# वय किंवा क्षमतांवर केंद्रित असावा कायदा!

**संदर्भ...** गुंतागुंतीच्या सामाजिक, आर्थिक परिप्रेक्ष्यातून बालविवाह कायद्याकडे मुलींच्या दृष्टिकोनातून पहायला हवे



**मधु मेहरा**
कार्यकारी संचालक
पार्टनर फॉर लॉ इन डेवलपमेंट

महिला आणि बालविकास मंत्रालय बालविवाहांना आता 'शून्य' घोषित करण्याचा विचार करत आहे. त्यासोबतच मुलांचे लग्नाचे कायदेशीर वय २१ वरून १८ वर्षांपर्यंत कमी करण्याचीही योजना आहे. एकेकाळी बालविवाहाकडे सामाजिक कुप्रथा म्हणून पाहिले जात असे, परंतु आज बालविवाहासाठीचा लढा लैंगिक समानता, मूलभूत हक्क आणि विकासाचा मुद्दा बनला आहे.

हा मुद्दा किशोरवयीन मुलींच्या मानवी हक्कांचा आहे. प्रश्न असा आहे की, आपल्याकडे संधी आणि वातावरण फक्त मुलींना लग्नासाठी तयार करणारे नसावे. प्रत्येक बाल संरक्षण कायद्यामुळे मुलींच्या तरुणांच्या आवडी आणि क्षमता आणि त्यांच्या वैयक्तिक निर्णय घेण्याच्या क्षमतांची वाढ करण्यासोबतच त्यांचा आदर देखील केला पाहिजे.

बालविवाहाची प्रथा रोखल्यामुळेच मुलींना नवीन व प्रगतीशील संधी निर्माण होतातच असे नाही. चौथ्या राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षणानुसार, १८ वर्षांआधी झालेल्या विवाहांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. आज मुलींमध्ये शिक्षण घेण्याची आणि विवाह उशिरा करणाऱ्या मुलींच्या संख्येत वाढ झाली आहे, मुलींना आर्थिक गरज आणि सामाजिक मान्यता आणि प्रतिष्ठेसाठी लग्नाची आवश्यकता आहे.

जरी शिक्षणाचं प्रमाण वाढलं असलं तरी रोजगाराच्या वाट्यात महिलांचे प्रमाण कमी असून ग्रामीण भागातही मजुरी करणाऱ्यांमध्ये महिलांच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे. यामुळे विवाह ही मुलींची आर्थिक गरज बनते. पण, मुलींच्या आयुष्यातील बराच वेळ हा पालकांच्या आणि नंतर सासरी घरगुती काम करण्यात वाया जातो, या मेहनतीचे कुठे मोजमाप केले जात नाही. अनेकवेळा गरीब कुटुंबातील मुलींना बऱ्याच वेळा शिक्षण सोडावे लागते आणि अशा परिस्थितीत विवाह लवकर करुन देण्याकडे कल जास्त असतो

या अवघड सामाजिक-आर्थिक वातावरणाच्या दरम्यान, बाल विवाह आणि बाल संरक्षण कायद्यांशी संबंधित काही प्रश्नांवर चर्चा होणे आवश्यक आहे. बालविवाहांचा आकडा शून्य घोषित करण्याची आणि विवाह करणाऱ्या कुटुंबांना शिक्षा देण्याच्या तरतुदी मुलींच्या हिताच्या ठरतील का? हे समजण्यासाठी कायदा काय म्हणतो, कोण याचा उपयोग करतो आणि कोणत्या कारणास्तव, करतो हे जाणून घेणे आवश्यक आहे. बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मध्ये किमान लग्नाचे वय निश्चित केले आहे, त्या व्यतिरिक्त ते बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी नियुक्त करतात, ज्यांचे कार्य बालविवाह थांबविणे आणि रद्द करणे हे आहे.

सध्या मुलींचे किमान विवाहाचे वय १८ वर्षे आणि मुलासाठी २१ वर्षे आहे. 'पार्टनर फॉर लॉ इन डेव्हलपमेंट चाईल्ड मॅरेज प्रोहिबिशन अॅक्ट'च्या संशोधनानुसार, हा कायदा बहुधा पालकांनी मुलींच्या स्वत: च्या मर्जीने केलेल्या लग्नाविरूद्ध खटला नोंदवण्यासाठी या कायद्याचा वापर करतात. ज्यामुळे अनेक वेळा मुलांवर कारवाई केली जाते. संशोधनानुसार ८३ केसमध्ये ६५ टक्के आईवडिल हे मुलींना स्वत:च्या मर्जीने केलेल्या विवाहांविरोधात या कायद्याचा वापर अधिक करताना आढळून आले आहे. मोजक्या प्रकरणात बालविवाह प्रतिबंधक अधिनियमाच्या हस्तक्षेपाने केस दाखल झाल्या आहेत. मोठ्या प्रमाणात या कायद्याचा वापर करुन मुलीच्या आईवडिलांनी स्वत:च्या मर्जीने विवाह केलेल्या मुलाच्या विरोधात बाल शोषण, लैंगिक अत्याचार पोक्सो अन्वये गुन्हे दाखल केलेले दिसतात.

२०१२ मध्ये पोक्सोच्या अंमलबजावणीनंतर लैंगिक संमतीचे वय १६ वर्षांवरून १८ वर्षांपर्यंत वाढविण्यात आले ज्यामुळे ते लग्नाच्या कायदेशीर वयाच्या समान होते. याचा परिणाम म्हणून, १८ वर्षांपेक्षा कमी वय असेल तर तिच्याशी केलेल्या संबंधांना बलात्कार मानले जाऊ लागले.

या कायद्यात लहान मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये शारीरिक, मानसिक आणि भावनिक पातळीवर फरक दिसत नाही.

अल्पवयीन विवाह कुटुंबियांकडून येणाऱ्या दबावामुळेच अधिक होतात. परंतु, दुर्दैव असे की कायदा अस्तित्वात असूनही त्यांच्यावर कोणती कारवाई होत नाही. बालविवाह प्रतिबंधक कायदा जबरदस्तीने होणाऱ्या विवाहापासून सुटका करू शकत नाही. दोन्ही कायदे आई-वडिलांचे नियंत्रण आणि नैतिक पोलिसींगसाठी वापरले जातात. कायदा साधारणपणे विवाह रोखण्यात आणि शिक्षा देण्यासाठी उपयुक्त ठरू शकतो. मुलीस सुरक्षित वातावरण, व्यवसाय संधी आणि अधिकारांसह संपूर्ण भविष्याची ग्वाही कायदा देत नाही. तक्रार दाखल झाल्यानंतर आई-वडिलांना अटक करणे अपरिहार्य आहे. मुलीस आधाराश्रमात पाठवले जाते. सारे कुटुंब विस्कटून जाते आणि अन्य मुलांना बिना देखरेखीशिवाय सोडून दिले जाते. यामुळे मुलीस एकूणच सामाजिक अस्थिरता त्रस्त करीत राहते. तक्रार दाखल करणे जितके मुश्किल तितकेच जोखमीचे आहे. विवाह रद्द केल्याने सामाजिक, आर्थिक आणि कायद्याचे वास्तव बदलू शकत नाही.

संयुक्त राष्ट्राच्या बाल हक्क करारानुसार १८ वर्षांपेक्षा कमी वयाचा मुलगा/मुलगी तर अल्पवयीन ठरतो. परंतु त्यांचे अधिकार आणि 'सर्वोत्तम हित' आणि 'वाढत्या क्षमता' यावरून निश्चित व्हायला हवेत. स्वत:चे निर्णय घेण्याची क्षमता आणि अधिकारांना संरक्षण देणे ही सरकार आणि समाजाची जबाबदारी ठरते. युवकांच्या हिताचा कायदा त्यांचे मानवाधिकार आणि क्षमतांवर केंद्रित असला पाहिजे. विशेषत: गरीब कुटुंबातील मुली आणि मुलांना व्यक्तीगत जीवन आणि भवितव्यावर नियंत्रण राखता येऊ शकेल.